महाराष्ट्र टाइम्स

गुरूवार २७ मार्च २०२५

# पर्यावरण प्रकल्पांचे लेखापरीक्षण हवे

## माधव गाडगीळ यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'नद्या शुद्धीकरणासाठी अभियान घोषित करणे पुरेसे नसून, प्रश्नाच्या मुळाशी जाऊन काम करण्याची गरज आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांसाठी सरकारकडून आवाक करणारे आकडे जाहीर होतात. पण प्रत्यक्षात काम किती झाले, हे बघण्यासाठी या प्रत्येक प्रकल्पांचे लेखपरीक्षण झाले पाहिजे,' असे मत ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी बुधवारी व्यक्त केले.

'किर्लोस्कर वसुंधरा'तर्फे आयोजित पाचव्या ऑनलाइन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सवा'च्या समारोप प्रसंगी डॉ. गाडगीळ बोलत होते. या वेळी ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान करण्यात आला. पत्रकार भवन येथे झालेल्या या कार्यक्रमाला महोत्सवाचे फॅसिलिटेटर आनंद चितळे, 'किर्लोस्कर वसुंधरा'चे मार्गदर्शक डॉ. गुरुदास नूलकर आणि संयोजक वीरेंद्र चित्राव उपस्थित होते.

'मी १९५२च्या सुमारास नळ स्टॉपजवळ राहत असताना मुळा-मुठा नदीमध्ये पोहायला जात होतो. इतके त्या नदीचे पाणी त्या वेळी निर्मळ होते. आता त्याची कल्पनाही करता येत नाही. नदीचे प्रदूषण होते तेव्हा वनस्पती, जलसृष्टीवरही त्याचे विपरीत परिणाम होतात,' असे गाडगीळ म्हणाले. वीरेंद्र चित्राव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अनिल गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.




डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान करण्यात आला. या वेळी (डावीकडून) वीरेंद्र चित्राव, डॉ. गाडगीळ, वडगबाळकर, आनंद चितळे आणि डॉ. गुरुदास नूलकर.

### 'राम नदीचे शुद्धिकरण सोपे'

'राम नदीच्या परिसरातील नैसर्गिक स्रोतांचा शोध घेऊन त्याचे जतन गरजेचे आहे. मुळा-मुठा या जमिनीच्या सम पातळीवर असल्याने त्यांच्या लगतच्या वस्तीकडून येणाऱ्या दूषित पाण्यामुळे या नद्यांचे प्रदूषण जास्त होते. तुलनेने राम नदी उंचावर असल्यामुळे तिचे शुद्धिकरण करणे अधिक सोपे आहे. राम नदी शुद्धिकरण प्रकल्प यशस्वीरीत्या राबवून देशासमोर एक यशस्वी प्रारूप उभे करणे शक्य आहे,' असे मत ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ आणि राम नदीचे अभ्यासक डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांनी व्यक्त केले.

Service By: Vidisha Media Network- 9881736077